ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २६ | पुणें, बुधवार तारीख १४ डिसेंबर, १९६० | अंक ४५


## महाराष्ट्र बँक रौप्यमहोत्सव विशेषांक



प्रो. वा. गो. काळे



श्री. भा. म. गुप्ते



श्री. वा. पुं. वर्दे



श्री. घों. कृ. साठे



श्री. फ. दो. पदमजी

—बँकेच्या स्थापनेपासूनचे संचालक—

## यशस्वी कारकीर्दीचें समालोचन

### नवीन जबाबदाऱ्या स्वीकारण्यास समर्थ

या देशांत सापेक्षत: लहान बँक घटकांचें व्यावसायिक अपयश हीच अद्यापहि साधारण प्रवृत्ति आहे. म्हणून, दूरदृष्टीनें परंतु प्रागतिक धोरणाचा अवलंब करून व्यवहार करण्याच्या कौशल्या-मुळें, या लहान वर्गांतून संक्रमण करून नुकत्याच वर येणाऱ्या बँकांचें यश पाहिलें म्हणजे समाधान वाटतें. महाराष्ट्र बँक ही अशा बँकांपैकीच एक आहे. तिच्या यशाबद्दल या रौप्यमहोत्सवा-च्या प्रसंगीं मी बँकेचें आणि तिच्या ५२ शाखांच्या वाढत्या ग्राहकवर्गाचेंहि मन:पूर्वक अभिनंदन करतों.

उपलब्ध माहितीच्या आधारें बँकेच्या यशस्वी कारकीर्दीचें समालोचन करतां पुढील गोष्टी लक्षांत येतात. तिनें आवश्यक त्याच गोष्टी करण्याकडे लक्ष केंद्रित केलें आहे; बँकिंगचीं मूलभूत तत्त्वें सातत्यानें आचरलीं आहेत, वेगानें बदलत जाणाऱ्या आर्थिक परिस्थितीस अनुसरून तांत्रिक बाबतींत आवश्यक तो लवचिकपणा व्यक्त केला आहे; कर्मचाऱ्यांची निवड योग्य पारख करून केली आहे आणि त्यांस आवश्यक तें शिक्षण पद्धतशीरपणें दिलें आहे. आज बँक नूतन निर्मित महाराष्ट्र राज्यांतील जनतेच्या अभ्युदयासाठी नवीन जबाबदाऱ्या स्वीकारण्यास समर्थ झाली आहे. मी तिला तिच्या अंगीकृत कार्यांत सुयश चिंतितों.

—चिं. द्वा. देशमुख

## महाराष्ट्र बँकेचा स्पृहणीय विशेष

कार्यक्षम अशी बँकिंग व्यवस्था हा व्यापार-उदीमाचा आधारस्तंभ आहे आणि व्यापार-उदीमाच्या अभिवृद्धीवर समाजाचा अभ्युदय अवलंबून आहे. महाराष्ट्रांतील विचारवंत समाजनेत्यांना या वस्तुस्थितीची प्रथमपासून तीव्र जाणीव असूनहि हीं दोन्हीं अंगें आपल्याकडे दीर्घकाल उपेक्षित राहिलीं. या जाणिवेमुळेंच गेल्या पिढींतील नामवंत अर्थशास्त्रज्ञ कै. प्रा. वा. गो. काळे हे सुदृढ अशा पायावर बँकिंग व्यवसायाची उभारणी करण्यास उद्युक्त झाले. बँक ऑफ महाराष्ट्र हें त्यांच्या व त्यांच्या सहकाऱ्यांच्या या क्षेत्रांतील आद्यपरिश्रमांचें फळ आहे. गेल्या पंचवीस वर्षांत महाराष्ट्र बँकेची एखाद्या जोमानें वाढणाऱ्या वृक्षाप्रमाणें सतत होत गेलेली प्रगति आणि महाराष्ट्रा-च्या बहुतेक भागांत पसरलेला तिचा शाखाविस्तार पाहून कोणा-सहि आनंद वाटेल.

महाराष्ट्र बँकेच्या बाबतींतील स्पृहणीय विशेष हा कीं, तिनें मध्यमवर्गीतील व्यक्तींनीं व्यापार-उदीमांच्या क्षेत्रांत पुढें यावें म्हणून त्यांस साहाय्य करण्याचें धोरण उद्दिष्ट म्हणून अंगीकारलें आहे; आणि तिचें सामर्थ्य याच वर्गाच्या लहान लहान बचतीं-तून उभारल्या गेलेल्या ठेवींतून निर्माण झालेलें आहे.

बँकेच्या रौप्यमहोत्सवाच्या या प्रसंगीं तिला तिच्या अंगीकृत कार्यांत सुयश चिंतितों आणि तिचें सामर्थ्य वृद्धिंगत होऊन तिचें कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्याच्या सीमाबाहेरहि विस्तार पावो अशी इच्छा व्यक्त करतों.

—यशवंतराव चव्हाण

## बँकेंत नोकरांनीं कसें वागावें ?

(१) कचेरींत कामाला येण्यास उशीर होऊं देऊं नका.

(२) वरचेवर कांहीं तास सुट्टी मागत जाऊं नका.

(३) घड्याळाकडे बघून काम करूं नका; काम संपवण्याकडे लक्ष द्या.

(४) तुम्हीं चूक केली, तर त्याचा दोष दुसऱ्यावर घालण्याचा प्रयत्न करूं नका.

(५) चुकीबद्दल रागे भरून घेण्याची पाळी आली, तर त्याबद्दल खट्टूपणा दर्शवूं नका.

(६) कचेरींतील इतरांच्याबद्दल बोलत बसूं नका; विश्वासभंग करूं नका.

(७) विनाकारण तक्रारी करूं नका. तक्रार करायची, ती योग्य माणसापाशींच करा.

(८) खासगी माहिती इतरांना सांगूं नका.

(९) कचेरींतून टेलिफोनवरून फार वेळां खासगी कारणासाठी बोलूं नका. मित्रांनीं तुम्हांला टेलिफोन केला, तर लवकर आवरतें घ्या.

(१०) पत्र डिक्टेट करत असाल, तर त्यांत एकसारख्या दुरुस्त्या करूं नका; तुम्हीं टिपून घेत असाल, तर डिक्टेट करणाराशीं विनाकारण बोलूं नका.


(११) दुसऱ्याच्या टेबलावरील पत्रें, हिशेबाचे कागद, इत्यादींस हात लावूं नका.

(१२) वरिष्ठांचें लांगूलचालन करूं नका; कनिष्ठांशीं उद्धटपणा करूं नका.

### महाराष्ट्र बँकेचे भाग आणि भागधारक

| भागसंख्या | एकूण भाग-धारकांची संख्या | एकूण भाग संख्या | रक्कम (रु.) | धारण केलेल्या भागांचे एकूण भाग संख्येशीं प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ ते १० | १५२० | ७,७४८ | ३,८७,४०० | १२·१० |
| ११ ते ५० | ६२२ | १५,७६६ | ७,८८,३०० | २४·६२ |
| ५१ ते १०० | १४३ | १०,८७७ | ५,४३,८५० | १७·०० |
| १०१ ते २५० | ९० | १४,४६६ | ७,२३,३०० | २२·६० |
| २५० पेक्षां अधिक | ३२ | १५,१४३ | ७,५७,१५० | २३·६८ |
| एकूण | २,४०७ | ६४,००० | ३२,००,००० | १००·०० |

### शाखाविस्तार



# अर्थ

बुधवार, ता. १४ डिसेंबर, १९६०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## महाराष्ट्र बँकेचा अधिकाधिक उत्कर्ष होवो

" महाराष्ट्राची आर्थिक व सामाजिक परिस्थिति एका विशिष्ट प्रकारच्या चाकोऱ्यांत जाऊन पडल्यानें त्यांत उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांची अभिवृद्धि प्रागतिक व संघटनात्मक पद्धतीनें झाल्यावांचून जनतेचा निभाव लागावयाचा नाहीं, ही जाणीव सर्वत्र उत्पन्न झाली आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. महाराष्ट्रीयांची संस्कृति अभिमानास्पद आहे ह्याविषयींची ग्वाही परप्रांतीय लोक देत आले आहेत, ही गोष्ट अभिनंदनीय आहे, व त्याबद्दल येथील जनतेस धन्यता वाटणें साहजिकच आहे. तथापि, एकांगीपणाचें वैगुण्य त्या संस्कृतीमध्यें उत्पन्न झालें असून, तें वेळींच दूर केलें गेलें नाहीं तर महाराष्ट्राची पीछेहाट झाल्यावांचून राहणार नाहीं, हा विचार अनेक विचारवंतांच्या मनास बोचत आहे. संपत्ति उत्पन्न करण्याचीं साधनें हातांत असतील तरच कोणत्याहि समाजास राजकारण, सामाजिक सुधारणा आणि कलांचा परिपोष ह्या गोष्टी साधतील. सांपत्तिक अभिवृद्धीच्या अभावीं कोणत्याहि संस्कृति लटपटीतच राहणार. धर्म आणि काम हे अर्थमूल आहेत असें चाणक्यानें आपल्या अर्थशास्त्रांत ठासून सांगितलें आहे त्याचें हेंच कारण आहे. समाजाच्या संस्कृतीचा ओघ बदलणें हें काम अर्थातच सोपें नाहीं. तथापि, त्या दिशेनें प्रयत्न होणें आणि त्या प्रयत्नांस जनतेचें साहाय अधिकाधिक लाभणें, ह्या गोष्टी महत्त्वाच्या आहेत." बँक ऑफ महाराष्ट्राच्या स्थापनेकडे लोकांनीं कोणत्या दृष्टीनें पाहिलें पाहिजे, ह्याचें विवरण "अर्था"नें ६ नोव्हेंबर, १९३५ च्या अंकांत वरीलप्रमाणें केलें होतें.

महाराष्ट्रांत बँकांच्या अपयशाची आठवण फार जुनी झाली नव्हती, अशा वेळीं भेकडपणास दूर सारून, महाराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांस आवश्यक असणाऱ्या नव्या बँकेच्या स्थापनेचा उद्योग आरंभून बँकेच्या उत्पादकांनीं हळूहळू पण निश्चितपणें पुढें पाऊल टाकण्याचें ठरविलें. बँकेच्या उद्घाटनप्रसंगीं प्रो. वा. गो. काळे ह्यांनीं जें भाषण केलें, त्यांत उत्पादकांना वाटत असलेली जबाबदारी स्पष्टपणें दिसून येत होती. श्री. वा. पुं. वर्दे, ह्यांचा लेख अन्यत्र उद्धृत केला आहे, त्यांत त्यांनीं संचालकांच्या अत्यंत उचित अशा धोरणाची तपशीलवार माहिती दिली आहे. तीवरून बँकेच्या चालकांनीं आपलें कर्तव्य किती तत्परतेनें पार पाडलेलें आहे, हें दिसून येईल. बँक ऑफ महाराष्ट्रानें महाराष्ट्रीय जनतेला त्याच्या कर्तृत्वाची जाणीव करून दिली व तिच्या स्वतःवरील विश्वास वृद्धिंगत केला. बँक ऑफ महाराष्ट्राचे उत्पादक ध्येयबुद्धीनें प्रेरित झालेले होते व ही संस्था आदर्श व अनुकरणीय करून दाखविण्याचा त्यांचा संकल्प होता. त्या बँकेनें केलेली प्रगति पाहतां, उत्पादकांचा हेतु सिद्धीस गेला, असेंच कोणीहि म्हणेल. त्यांच्या मूळ अपेक्षेपेक्षा बँकेचें कार्यक्षेत्र वाढलें आहे आणि जनतेनें उत्पादकांच्या परिश्रमाचें चीज केलें आहे. बँकेच्या रौप्यमहोत्सवाचे निमित्तानें आम्हीं बँकेला अधिकाधिक उत्कर्ष चिंतितों. बँकेचा उत्कर्ष म्हणजेच महाराष्ट्रीय व्यापार-उद्योगाचा उत्कर्ष होय.

## बँक ऑफ महाराष्ट्र लि. ची सालोसाल प्रगति

१६ सप्टेंबर, १९३५—बँकेची स्थापना.

१९३७—बँकेचे दुसरे वर्षींच द. सा. द. शें. ३½ टक्के प्रमाणें करमाफ डिव्हिडंड वाटण्यांत आलें.

१९३८—प्राथमिक स्वरूपी सर्व खर्च लिहून टाकण्यांत येऊन मुंबई येथें पहिली शाखा उघडण्यांत आली.

१९४०—डेक्कन जिमखाना येथें स्थानिक शाखा उघडली.

१९४२—बँकेचे प्रथमपासून असलेले मॅनेजर श्री. एम्. व्ही. गोखले सेवानिवृत्त झाले.

१९४३—जळगांव (पूर्व खानदेश) व नागपूर येथें दोन नवीन शाखा काढण्यांत आल्या. बँकेनें स्वतःचे इमारतीसाठी विश्रामबाग वाड्यासमोर १ लक्ष, ५ हजार रुपयांस जागा खरेदी केली. श्री. चिं. वि. जोग ह्यांची मॅनेजर म्हणून नेमणूक.

१९४४—बँकेनें ५ रु. वाढाव्यानें काढलेले सर्व शेअर्स खपले जाऊन वाढाव्याची सर्व रक्कम (१,३२,९९५ रु.) गंगाजळींत टाकण्यांत आली. बँकेनें शेड्यूल्ड होण्याचा मान पटकावला. गिरगांव (मुंबई) व खडकी येथें दोन नवीन शाखा उघडल्या.

१९४५—रत्नागिरी व कोपरगांव येथें शाखा व फैजपूर (पूर्व खानदेश) येथें पे ऑफिसें उघडण्यांत आलीं. बँकेनें एक्झिक्यूटर व ट्रस्टीचें काम करण्याकरितां स्वतःची सबसिडिअरी कंपनी काढण्याचें ठरविलें.

१९४६—धुळें, सोलापूर, चाळिसगांव, नाशिक, हुबळी, कल्याण व इतवारी (नागपूर) येथें नवीन शाखा उघडण्यांत आल्या. प्रो. काळे ह्यांचा मृत्यु.

१९४७—बँकेनें ५ रु. वाढाव्यानें काढलेले सर्व शेअर्स खपून वाढाव्याची सर्व रक्कम (७०,००० रु.) गंगाजळींत टाकण्यांत आली. दादर येथें शाखा उघडली.

१९४८—श्री. वा. पुं. वर्दे, ह्यांची रिझर्व्ह बँकेच्या मुंबई लोकल बोर्डावर नेमणूक झाली म्हणून त्यांस बँकेच्या बोर्डाचें सभासदत्व सोडावें लागलें.

१९४९—कोल्हापूर, हैद्राबाद येथें दोन शाखा व सोलापूर येथें एक उपशाखा उघडण्यांत आली.

१९५१—सांगली व अमरावती येथें दोन शाखा उघडण्यांत आल्या. मॅनेजर श्री. चिं. वि. जोग, ह्यांना बँकिंगच्या उच्च शिक्षणासाठी युनायटेड किंग्डम—युरोपला पाठविलें. इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्स, लंडन, ह्या संस्थेचे ते फेलो निवडले गेले.

१९५२—ठाणें व हरिहर येथें दोन शाखा उघडल्या.

१९५३—मुख्य कचेरीच्या इमारतीचा उद्घाटन समारंभ.

१९५५—बँकेला बँकिंग कंपन्यांचे कायद्याखालील लायसेन्स.

१९५८—बँकेनें बांथिया बँक लि. चीं कांहीं देणीं-घेणीं पत्करून सहा नव्या शाखांना त्यामुळें प्रारंभ झाला.

१९५९—बँकेचे भाग मुंबई स्टॉक एक्सचेंजच्या कॅश लिस्टांत आले.

१९६०—बॉंबे स्टेट फिनॅन्स कॉर्पोरेशननें लहान व मध्यम आकाराच्या उद्योगांच्या अर्जांसाठी बँकेला एजंट नेमलें. बँकेला सर्व चलनांतल्या परदेशी हुंडणावळीचा लायसेन्स मिळाला. बँकेचा रौप्यमहोत्सव.

# आमचे वर्दे

## ( एक आगळी व्यक्तिरेखा )

महाराष्ट्र बँकेचे चेअरमन म्हणूनच नव्हे तर अनेक संस्थांशीं संबंधित म्हणून श्री. वामनराव वर्दे आज भारताला परिचित आहेत. तरीपण श्री. वर्दे यांचें नांव घेतल्यानंतर कुणालाहि त्यांचा संबंध असलेल्या अन्य संस्था न आठवतां महाराष्ट्र बँक, सारस्वत सहकारी बँक, किंवा महाराष्ट्र राज्य सहकारी बँक ( पूर्वीची मुंबई प्रांतिक सहकारी बँक ) हींच नांवें प्रथम आठवतात. वर्दे म्हणजे बँकिंग व बँकिंग म्हणजे महाराष्ट्रापुरते तरी श्री. वर्दे असें हें समीकरणच झालें आहे.

वर लिहिलेल्या तीन बँकांचे पदाधिकारी किंवा संचालक-मंडळांतील स्थानामुळें हें समीकरण झालें नाहीं, तर श्री. वामनरावांचा बँकिंगच्या विषयाशीं गेले बेचाळीस वर्षे अखंड संबंध आहे. म्हणजेच सुमारें साडेतीन तपांचा कालखंड त्यांनीं बँकिंगचा अभ्यास करण्यांत, त्याबद्दल अखंड विचार करण्यांत घालवला आहे. विशेषतः कर्मचारी वर्गाला तर त्यांचं उदाहरण हें एक स्फूर्तिस्थान व्हायला हवें अशा रीतीनें त्यांनीं या क्षेत्रांत आपलें यश संपादन केलें आहे. सिडनहॅम कॉलेजमधून बी. कॉम. ची परीक्षा पास झाल्यानंतर कांहींतरी क्षेत्र निवडायला हवें अशा योगायोगानें ते या व्यवसायांत आले नाहींत. तर बँकिंगबद्दल मुळापासूनच आवड असल्यानें त्यांनीं सुरवातीला शिलोत्री बँकेसारख्या ठिकाणीं सबसिडीअरी पुस्तकें लिहिण्यापासून व तेहि कांहीं वेळां विनावेतन वा तासाला कांहीं रक्कम अशा पद्धतीनें त्यांनीं आपल्या करीअरला सुरुवात केली. त्यानंतर टाटा इंडस्ट्रिअल बँक, युनियन बँक, बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक, यांसारख्या बँकांतून त्यांनीं कामें केलीं. त्यामुळें केवळ पदाधिकारी म्हणूनच त्यांना बँकिंग माहिती आहे असें नाहीं. खालच्या वर्गांतल्या साध्या कामापासून त्यांना प्रत्येक प्रकारचें काम कसें करायचें हें माहीत असल्यानें त्यांना याबाबत कुणीहि चकवूं शकत नाहीं. मुंबई प्रांतिक बँकेंत चीफ अकौंटंटच्या जागेपर्यंत ते गुणावरच चढत गेले व तिथेंहि अनेकदां त्यांनीं मॅनेजरचें काम बघितलें. पण हें काम त्यांना सांगितलें गेलें असतांना मला आधीं तो हुद्दा द्या, किंवा अमका पगार द्या, किंवा पंधरा वर्षांनंतर मला काय मिळेल तें आज सांगा, अशा कधीं अटी घातल्या नाहींत. आधीं काम करून, लायकी दाखवून मगच त्यांनीं त्याबाबत आपला हक्क मांडला व तो नाकारला जात आहे असं वाटलं तेव्हां मात्र वरिष्ठांशीं उघडपणें मतभेद व्यक्त करण्याचं धाडस त्यांनीं केलं व आपला स्वाभिमानहि दाखवला. ' Deserve & Desire ' हेंच जणूं कांहीं त्यांचं या व्यवसायांतल्या व्यक्तींसाठीं सांगणं आहे. पण इतकं असूनहि त्यांनीं स्वतः कित्येक वेळां अशी Desire ही दाखवलेली नाहीं. किंबहुना प्रसिद्धीला ते हपापलेले तर नाहींतच पण तिच्यापासून ते नेहमीं चार पावलें दूर असतात. नाहींतर अन्य लोकांप्रमाणें ते वागते तर आज त्यांच्या केवळ गुणांवरच त्यांनीं अनेक महत्त्वाचीं स्थानें भूषवलीं असतीं. सहकारी बँकिंग व व्यापारी बँकिंग या दोन्हींशीं घनिष्ट संबंध असणाऱ्या बोटांवर मोजल्या जाणाऱ्या व्यक्तींत त्यांचा क्रम लागतो तरीसुद्धां स्टेट बँकेच्या स्थापनेच्या वेळीं केवळ ते प्रसिद्धीपराङ्मुख असल्यानें कुठल्याहि जागेच्या वेळीं त्यांचें नांव लक्षांत आलें नसावें. इतकें असूनहि बँकिंगच्या कामासंबंधीं जेव्हां त्यांची मदत लागली तेव्हां ते स्वतः तिथं लगेच गेले आहेत. सारस्वत बँकेला आजचं, पतपेढी ऐवजीं एक चांगली सहकारी बँक म्हणून मिळालेलं मानाचं स्थान, सी. के. पी. व दक्षिणी व्यापारी (डेक्कन मर्चंटस) बँक यांची पुनर्घटना या सर्व गोष्टी श्री. वर्दे यांच्या पुढाकारामुळेंच शक्य झाल्या आहेत. आज अनेक संस्थांशीं संचालक म्हणून संबंध असला तरी वामनरावांनीं कुठल्याहि बँकेची सभा शक्य तों चुकवलेली नाहीं. वेळ पडली तर दुसऱ्या सभेला ते जात नाहींत, पण बँकिंगविषयक कारभाराला त्यांच्या सर्वच जीवनांत अग्रस्थान आहे.

श्री. वर्दे यांचा जन्म त्यादृष्टीनें गरीब कुटुंबांत झाला. रत्नागिरीला शालेय शिक्षण व मुंबईला महाविद्यालयीन शिक्षण झाल्यानंतर वर लिहिल्याप्रमाणें ते अनेक बँकांतून कामें करीत होते. मुंबई प्रांतिक बँकेंत जेव्हां त्यांचा स्वाभिमान दुखावला जाण्याची वेळ आली होती त्या वेळेलाच सुदैवानें त्यांच्या मामांच्या पेढींत म्हणजे आर. आर. नाबर कंपनींत त्यांना स्थान मिळालें व कदाचित् बँकिंगशी त्यांचा संबंध तुटतोय कीं काय अशी परिस्थिति निर्माण झाली. पण 'बँकिंग' वर्देंच्या जीवनांतून बाजूला जायला तयार नव्हते ! त्याच वेळेला महाराष्ट्राला एक व्यापारी बँक असावी या कल्पनेचा सहकारी बँकांच्या कारभारांतील अडचणी जवळून बघितल्यानें त्यांनीं पाठपुरावा करायला सुरुवात केली. १९३४ मध्यें त्यांनीं केसरींत लेख लिहून या विषयाला जाहीर तोंड फोडलें व त्यानंतर महाराष्ट्र बँकेच्या स्थापनेसाठीं अविरत श्रम करून आपल्या इतर सहकाऱ्यांसह त्यांनीं ती गोष्ट सत्यसृष्टींत आणली व तेव्हांपासून आजपर्यंत ते बँकेची नेहमींच काळजी वाहत आले आहेत. कै. वामनराव काळे यांच्या निधनानंतर त्यामुळेंच संचालक मंडळानें श्री. साठे यांची अध्यक्ष, तर श्री. वर्दे यांची उपाध्यक्ष म्हणून नेमणूक केली. १९४९ मध्यें रिझर्व्ह बँकेच्या मुंबई विभागाच्या मंडळावर त्यांना स्थान मिळालें तेव्हां तिथल्या नियमामुळें त्यांनीं महाराष्ट्र बँकेच्या संचालकपदाचा राजीनामा दिला. पण १९५३ सालीं सहकाऱ्यांच्या विनंतीस मान देऊन रिझर्व्ह बँकेच्या मंडळ-सदस्यत्वाचा राजीनामा देऊन बँकेसाठीं, महाराष्ट्रासाठीं, व सहकाऱ्यांसाठीं परत बँकेंत येण्यांत त्यांनीं एक आगळीच गोष्ट करून दाखवली. बँकेचा कारभार बघतांना ते आर. आर. नाबर कंपनीचे भागीदार आहेत ही गोष्टहि विसरून जातात. एकाच व्यक्तीच्या दोन्ही संबंधामुळें, लोकांनीं कुठलाहि अन्वयार्थ लावूं नये याची काळजी घेतांना ते त्यांच्या अन्योन्य संबंधाचे वेळीं, जरूर पडली तर परखड बोलायलाहि कमी करीत नाहींत. कुठलीहि गोष्ट नीट विचारपूर्वकच करायची ही त्यांना पहिल्यापासून संवय असल्यानें त्यांचा बोलण्यांतहि संयम सुटत नाहीं. त्यामुळेंच कित्येकदां त्यांच्या मनांत काय आहे हें कळणं कठीण होतं. कित्येकदां श्री. वर्दे हे नवीन सुधारणा स्वीकारण्यास लौकर कबूल होत नाहींत असेंहि संबंधितांना वाटतें; पण खरी गोष्ट तशी नाहीं. सारस्वत बँकेंत बी. कॉम., एम. ए. च्या विद्यार्थ्यांसाठीं लायब्ररीची त्यांनीं केलेली योजना, त्याच बँकेंत महिलांचा काढलेला स्वतंत्र विभाग, त्याचा ताळेबंद वेगळ्या पद्धतींत मांडण्याची कल्पना यांचा विचार केल्यास हें लगेच समजून येईल. लंडनच्या इन्स्टिटयूट ऑफ बँकर्सचे ते फेलो आहेत, ही आणखी एक गोष्ट त्यांना बाहेर किती मानले जाते ही दाखवण्यास पुरेशी आहे. गेलीं ४२ वर्षे या व्यवसायांत असूनहि श्री. वर्दे यांनीं आपल्या ज्ञानाचा बडेजाव कधींहि दाखवला नाहीं. दे ज्ञान उपकार करी, न बोले या तऱ्हेची वृत्ति असलेला अध्यक्ष महाराष्ट्र बँकेला मिळाला हें तिचें खरोखरीच भाग्य आहे आणि त्यांच्या नेतृत्वाखालीं महाराष्ट्राचा आर्थिक विकास जास्तींत जास्त करण्याचा महाराष्ट्र बँक प्रयत्न करील यांत तिळमात्र शंका नाहीं.

चिं. वि. जोग

# महाराष्ट्र बँकेच्या यशाचें रहस्य

## पूर्वेतिहास : ध्येयनिष्ठेचें धोरण व व्यवस्था : प्रो. काळे यांनीं नेमून दिलेले संकेत

लेखक : श्री. वा. पुं. वर्दे, बी. कॉम., एफ. आय. बी. ( लंडन )

बी. कॉम. च्या परीक्षेसाठी मी बँकिंग हा ऐच्छिक विषय घेतला होता, त्या वेळींच भारतांत, विशेषतः महाराष्ट्रांत, बँकिंगच्या सोई अत्यल्प असल्याचें मला आढळून आलें. बँकिंगच्या सोईची योग्य ती वाढ झालेली नसल्यानें, व्यापार-उदीम व कारखानदारी ह्यांची फारच कुचंबणा होत होती. माझ्या कॉलेजच्या विद्यार्थी-दशेंत आणि पदवी मिळविल्यानंतर मी प्रत्यक्ष अनुभवाच्या शिक्षणासाठी लहान व मोठ्या बँकांत प्रत्यक्ष काम केलें. त्या वेळीं मला असें स्पष्ट दिसलें, कीं मोठे व्यापारी व कारखानदार ह्यांना बँकांकडून कर्जें मिळूं शकलीं तरी लहान व मध्यम प्रमाणांत व्यवहार करणारांना बँकांकडून कसल्याहि प्रकारची मदत मिळणें जवळ जवळ अशक्य होतें. महाराष्ट्रांत, किंवा सबंध मुंबई राज्यांतच म्हणा ना, इंपीरिअल बँक किंवा बँक ऑफ इंडिया ह्यांच्या कांहीं थोड्या शाखा होत्या. व्यापारी बँका ज्या प्रकारची आर्थिक मदत देतात तशी मदत जिल्हा व अर्बन सहकारी बँका देऊं शकत नाहींत. नव्यानेंच निघालेल्या टाटा इंडस्ट्रिअल बँकेंत, युनियन बँक ऑफ इंडियांत आणि मुंबई प्रांतिक सहकारी बँकेंत वेगवेगळ्या जागांवर मी काम केलें असल्यामुळें, मी महाराष्ट्राकरितां बँकिंगची संस्था स्थापण्याचें योजिलें व १९२६ सालीं महाराष्ट्र बँकिंग कॉर्पोरेशन ह्या नांवानें एक कंपनी नोंदविली. त्या वेळच्या मंदीमुळें ह्या कंपनीस पुरेसा पाठिंबा मिळाला नाहीं. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सची १९२७ मध्यें स्थापना झाल्यावर, चेंबरच्या दुसऱ्या तिमाही सभेंत बँकेची कल्पना मी मांडली; परंतु तिचेकडे कोणी विशेष लक्ष दिलें नाहीं. त्या सभेंतील चर्चेची फलप्राप्ति म्हटली, तर गिरगांवांतील डेक्कन मर्चंटस् को. के. सोसायटीचें पुनरुज्जीवन होऊन तिचें १९२९ मध्यें दि डेक्कन मर्चंटस् को. बँक लि. मध्यें रूपांतर झालें.

ह्या सर्व काळांत, महाराष्ट्राकरितां सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार करणाऱ्या बँकेची गरज अधिकच तीव्र होत चालली. पुणें येथें मराठा चेंबरची स्थापना झाली, तेव्हां चेंबरचे सेक्रेटरी श्री. आ. रा. भट आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष, प्रो. वा. गो. काळे आणि धोंडू मामा साठे ह्यांचेशीं झालेल्या चर्चेंत असें ठरलें, कीं अशा बँकेच्या स्थापनेसाठी तात्काळ प्रत्यक्ष पाऊल पुढें टाकण्यांत यावें. मेमोरँडम व ऑर्टिकल्स ऑफ असोसिएशन तयार करण्याचें काम सेक्रेटरींच्याकडे सोंपविण्यांत आलें. ऑगस्ट, १९३४ मध्यें केसरीचा महाराष्ट्र विशेषांक प्रसिद्ध व्हावयाचा होता, त्यांत लेख लिहून बँकेची कल्पना जनतेपुढें मांडण्याचें काम माझेकडे होतें. बँक नोंदली जाण्यापूर्वीचा तिचा इतिहास थोडक्यांत असा आहे. प्राथमिक कार्य पुरें होण्यास थोडा वेळ लागला. कारण, महाराष्ट्रांतील वेगवेगळ्या जिल्ह्यांचें प्रातिनिधिक संचालक मंडळ बनविण्याचा उत्पादकांचा प्रयत्न होता. सर्व संचालक पुण्यांतीलच आहेत, अशी तक्रार कांहींजण करतात. परंतु, संचालक मंडळांत महाराष्ट्रांतील वेगवेगळ्या भागांतील प्रमुख गृहस्थांना घेण्याचे प्रयत्न करूनहि ते फसले, हें त्या तक्रारीस उत्तर आहे. अखेर १६, सप्टेंबर, १९३५ रोजीं बँक नोंदविण्यांत आली.



श्री वा. पुं. वर्दे, चेअरमन

बँकेची व्यवस्था पाहण्यासाठी मॅनेजिंग एजन्सी फर्म असण्यास तेव्हां कायद्याचा प्रतिबंध नव्हता. परंतु प्रो. काळे ह्यांचें व माझें दोघांचेंहि मत असें होतें, कीं बँकेची व्यवस्था पाहण्यासाठी योग्य लायकीचा व अनुभवाचा पगारी मॅनेजरच असावा आणि त्याला बँकेच्या प्रगतीनुसार व त्याचेवर पडणाऱ्या जबाबदारी-नुसार पुरेसा पगार द्यावा; त्यानें संचालक मंडळाच्या पूर्ण नियंत्रणाखाली काम करावें. प्रो. काळे व मी ह्यांचेमध्यें अलिखित असे नियम ठरलेले असत व इतर संचालकांचीहि त्यास मान्यता असे. बँकेच्या व्यवहारांत किंवा व्यवस्थेंत कोणाचेहि व्यक्तिगत हितसंबंध असूं नयेत, हा त्यांतला पहिला नियम. दुसरी गोष्ट म्हणजे, बँक ही कोणाहि एका व्यक्तीची किंवा कांहीं व्यक्तींच्या गटाची बनतां कामा नये. त्याचप्रमाणें कांहीं व्यापाऱ्यांच्या किंवा व्यक्तींच्या एखाद्या गटाचेंच हित बँकेनें पाहतां कामा नये. ती खऱ्या अर्थानें महाराष्ट्राची बँक — बँक ऑफ महाराष्ट्र — झाली पाहिजे, आणि तीहि महाराष्ट्रीय ह्या संज्ञेच्या खऱ्या अर्थानें. पक्षविशिष्ट, राजकीय किंवा इतर मतांस बँकेच्या कारभारांत स्थान असतां कामा नये आणि संचालक मंडळापुढें येणाऱ्या प्रश्नांचा विचार करतांना कोणत्याहि बाह्य किंवा अप्रस्तुत गोष्टीस स्थान मिळतां काम नये. बँकेची भक्कम पायावर वाढ व्हावी, हा संचालकांचा एकच ध्यास असला पाहिजे. ( १ ) ठेवीदारांच्या पैशाची सुरक्षितता, आणि ( २ ) महाराष्ट्रांत व्यापार—उदीम व कारखानदारी वाढावी ह्या दृष्टीनें राजकीय किंवा इतर पक्षविषयक विचारांपासून अलिप्त राहून सर्व पतवाल्या अर्जदारांना निर्दोष पद्धतीनें आर्थिक साहाय्य करणें, हेंच ध्येय पुढें ठेवलें होतें. आतां प्रसिद्धीस पावलेला यूनोमधील 'व्हेटो' बँकेच्या संचालक मंडळांत प्रथमपासूनच अंमलांत आहे. त्याच्या सभेंत कोणत्याहि प्रश्नावर मतें घेतलीं जात नसत; सर्व ठराव एकमतानें केले जात. संचालकांच्या सभेंत मामुली पद्धतीनें प्रश्न मांडण्यापूर्वी संचालकांशीं त्यांची खाजगी रीतीनें चर्चा केली जाई.

अगदी प्रारंभीं घेतलेले कांहीं लोक वगळले तर, बँकेनें असें धोरणच ठरविलेलें होतें, कीं तिच्या परंपरेशीं एकरूप होणारा नोकरवर्ग बँकेनेंच तयार करावा; ज्यास्त पगार देऊन इतर

बँकेतील नोकरांना मोहवून आपल्याकडे आकृष्ट करूं नये. नोकरवर्गाचे व बँकेचे संबंध अत्यंत सलोख्याचे व आत्मीयतेचे राहवेत आणि त्यांना भरपूर वेतन देण्यांत यावें. ह्या अगदीं प्रारंभीपासूनच्या धोरणामुळें बँकिंग अवार्डच्या अटी महाराष्ट्र बँकेस कधींच जाचक वाटल्या नाहींत. बँकेच्या दैनंदिन कारभारांत कोणत्याहि संचालकानें किंवा संचालक मंडळानें ढवळाढवळ करूं नये. फक्त धोरण संचालक मंडळानें ठरवावयाचें; अंतर्गत कारभार व्यवस्थापकानें पाहावयाचा. सर्व कर्जे व गुंतवणुकी ह्यांची संचालक मंडळानें किंवा त्यानें नेमलेल्या खास समितीनें छाननी करून मंजूर करावयाची. उघड आणि गुप्त असे भक्कम रिझर्व्हज वाढवावयाचे आणि वाजवी स्थिर दरानें डिव्हिडंड वाटावयाचें. नव्या शाखा उघडण्याची घाई करावयाची नाहीं. नव्या शाखेचा पहिल्या कांहीं वर्षांचा तोटा सहज भरून काढतां येईल, एवढी वार्षिक नफ्यांत फूस राहात असेल तरच नवीन शाखा काढावयाची; त्याखेरीज नाहीं. त्याचप्रमाणें, शाखांच्या देखरेखीची व तपासणीची योग्य व्यवस्था करावयाची. ज्या जिंदगीला बाजारांत किंमत नाहीं, अशा जिंदगीला ताळेबंदांत स्थानच द्यावयाचें नाहीं. सर्व नाममात्र जिंदगी त्या त्या वर्षाच्या नफा-तोटा पत्रकांत लिहून टाकावयाची. बँकिंगच्या धंद्याचें वैशिष्ट्य लक्षांत ठेवून भागीदारांना देतां येईल तेवढी भरपूर माहिती पुरवावयाची. धंदा मिळविण्यासाठी व्यापारी किंवा सहकारी बँकांशीं स्पर्धा करावयाची नाहीं. प्रो. काळे ह्यांनीं नेमून दिलेल्या ह्या अत्यंत इष्ट व हितकारक संकेतांमुळें १९४९ च्या बँकिंग कंपनीज कायद्याच्या कोणत्याहि कलमांत व्यवहार बसविण्याची बँकेला कधींहि यत्किंचितसुद्धां अडचण पडली नाहीं. बँकेच्या ह्या सुरक्षितपणाच्या धोरणामुळें, तिनें पैसे गुंतविणाऱ्या वर्गाचा विश्वास संपादन केला आहे आणि तिची सालोसाल अखंड प्रगति होत आहे.

प्रो. काळे ह्यांनीं बँकेचा पाया मजबूत बसविला; स्वतःचें महत्त्व वाढविणें किंवा स्वतःची जाहिरात करणें ह्यांपासून ते पूर्णपणें अलिप्त होते. बँक ऑफ महाराष्ट्र ही महाराष्ट्रीय सुशिक्षित तरुण अधिकाऱ्यांनीं चालविलेली एक आदर्श बँक व्हावी, असा त्यांचा कटाक्ष होता. प्रो. काळे ह्यांनीं आपल्या हयातींतच श्री. धोंडूमामा साठे ह्यांची अध्यक्ष म्हणून योजना केली व त्यानंतर अखेरपर्यंत ते संचालक मंडळाचे एक साधे सदस्य म्हणून राहिले, ह्यावरूनच त्यांची स्वार्थत्यागी व विरक्त वृत्ति दिसून येते.

---

# महाराष्ट्र बँकेच्या प्रगतीचा आढावा

## चेअरमन, संचालक आणि व्यवस्थापक ह्यांच्या कामगिरीचें स्मरण

लेखक : श्री. धों. कृ. साठे, बी. ए., बी. एस्सी.

१९२५ सालानंतर महाराष्ट्रांत मोठी अशी आर्थिक संस्था नसल्यानें लहानसहान उद्योगधंदे व व्यापार यांना अडीअडचणींचे वेळीं मदत मिळणें दुरापास्त झालें होतें व त्यादृष्टीनें महाराष्ट्राच्या सेवेस आपलाहि कांहीं हातभार लावावा अशा उच्च उद्देशानें बँकेच्या संस्थापकांनीं ही बँक काढली. फक्त ठेवी गोळा करून वैयक्तिक लाभासाठी त्याचा उपयोग करणें हें ध्येय येथें मुळींच नव्हतें. आरंभापासूनच ही बँक सर्व महाराष्ट्रीयांची आहे; कोणाहि एका व्यक्ति वा गटाची नाहीं. हा दृष्टिकोण ठेवल्यामुळें संचालकांनीं कुठल्याहि दृष्टीनें त्यांत अधिकारपद स्वीकारलें नाहीं किंवा आपले हितसंबंधीयांनाहि अधिकाराच्या जागेवर नेमलेले नाहीं.

### संचालकांतील एकोपा व ध्येयनिष्ठा

पहिल्याच संचालक मंडळांत आम्हांला अखिल भारतीय कीर्तीचे अर्थशास्त्रज्ञ कै. प्रो. वा. गो. काळे हे अध्यक्ष म्हणून लाभले. बँकिंगच्या शास्त्रशुद्ध तत्त्वावर त्यांच्या मार्गदर्शनाखाली तेव्हां ध्येय धोरण ठरविण्यांत आलें व तर्कशुद्ध व्यवहाराचा सर्वांनीं मिळून पाया घातला व त्याच तत्त्वांचें आजहि आम्हीं परिशीलन करीत असल्यानेंच बँकेची भरभराट इतक्या लौकर होऊं शकली आहे. श्री. वामनराव वर्दे ह्यांच्या व्यासंगाचा व गाढ अनुभवाचा लाभ बँकेस सतत मिळत आला आहे. त्यांचें नेतृत्व बँकेस भूषणावह आहे. सर्व संचालकांनीं बँकेचें काम हें आपलेंच काम आहे असें समजून काम केलें, व त्यामुळें आमचा कारभार प्रारंभापासून आज २५ वर्षें एकोप्यानें व एकदिलानें चालला आहे बँकेच्या कारभारांत संचालक मंडळापैकी कुणाचे वैयक्तिक हितसंबंध गुंतलेले नाहींत.

### व्यवस्थापकांची पोषक वृत्ति

"आमच्या या वृत्तीशीं पोषक असेच व्यवस्थापकहि आम्हांस लाभले होते व आहेत. पहिले व्यवस्थापक श्री. मा. वि. गोखले हे ७ वर्षें त्या पदावर होते व त्यांनीं आपला कारभार चोख केला. नंतर श्री. जोग आले तेहि व्यवहारांत चोख, दक्ष व बँकेची वाढ हीच आपल्या महत्त्वाकांक्षेची वाढ अशी वृत्ति ठेवणारे आहेत. इथें येण्यापूर्वी ते भारतांतील प्रमुख अशा दोन बँकांत नोकरीस होते. पण आमच्याप्रमाणेंच महाराष्ट्राच्या सेवेंत आपलाहि कांहीं हातभार असावा या हेतूनें ते आमच्यांत आले. इतर लोक प्रगतीसाठी लहान संस्थांतून मोठ्या संस्थांत जाण्याची धडपड करतात प्रण तत्त्वासाठी मोठ्या संस्थेतून लहान संस्थेत येणें व तिची वाढ करण्याचा प्रयत्न करणें या त्यांच्या दृढनिश्चयामुळें त्यांच्या १८ वर्षांच्या कारकीर्दींत बँकेची खूपच वाढ झाली आहे, व तिनें लोकांचा दृढविश्वास संपादन केला आहे.

### शेअरहोल्डरांना दिलेलें डिव्हिडंड

| वर्ष | दर |
|---|---|
| १९३७ ते १९३९ | ३½ % करमाफ |
| १९४० ते १९४१ | ४ % ,, |
| १९४२ ते १९४३ | ४½ % ,, |
| १९४४ ते १९५५ | ५ % ,, |
| १९५६ व १९५७ | ६ % ,, |
| १९५८ | ६½ % ,, |
| १९५९ | ९ % (करपात्र) |



बँकेचे जनरल मॅनेजर, श्री. चिं. वि. जोग आणि त्यांचे शेजारी बँकेचा सर्वांत जुना कर्मचारी जमादार श्री. रु. गो. भोसले

## बँकेचें हित, हा एकच ध्यास

### प्रो. काळे ह्यांचें मार्गदर्शन


लेखकः—श्री. चिं. वि. जोग, बां. कॉम., एफ. आय. बी. (लंडन)

महाराष्ट्र बँकेचें नांव माझ्या मनांत प्रथम कोणी आणलें असेल तर तें प्रो. काळे ह्यांनीं. त्यांनीं माझ्या विचारास चालना दिली, तरी माझ्या मनाचा निश्चय होईना, कारण मी दुसऱ्या एका बँकेशीं नोकरीच्या करारानें बद्ध होतों. त्या बँकेशीं माझा करार संपण्याच्या सुमारासच महाराष्ट्र बँकेच्या मॅनेजरची जागा रिकामी होऊन तिचेसाठी अर्ज मागविण्यांत आले होते. इतर बँकांच्या कारभाराशीं माझा प्रत्यक्ष संबंध आलेला असल्याकारणानें, माझ्या प्रांतासाठी मी काय करूं शकेन असा प्रश्न माझेपुढें नेहमीं उभा राही आणि आतां माझ्या लोकांच्यासाठी कर्तव्य पार पाडण्याची ही संधि चालून आली होती. प्रो. काळे ह्यांनीं माझ्या मनांत भरविलेली कल्पना दृढमूल होऊं लागली. तथापि मनाची स्थिति द्विधा झाली. कांहीं मित्रांनीं ही संधि न सोडण्याचा सल्ला दिला, तर कांहींनीं विरुद्ध मत दिलें. महाराष्ट्र बँक ही कांहीं झालें तरी अगदीं लहान बँक आहे, असें ते म्हणत. परंतु प्रो. काळे ह्यांचें डायरेक्टर बोर्डावरील अस्तित्व महाराष्ट्र बँकेंत येण्याचा माझा निर्णय घडविण्यास कारणीभूत झाला. त्यामुळें, त्यांच्या हाताखाली काम करण्याची व त्यांच्या खास मार्गदर्शनाखाली शिकण्याची सुसंधि मला प्राप्त झाली. हा निर्णय मी घेतला, त्यांत माझी चूक झाली, असें मला कधींहि वाटलें नाहीं.

महाराष्ट्र बँकेंत दाखल झाल्यानंतर सुमारें तीन वर्षें प्रो. काळे ह्यांचे देखरेखीखाली काम करण्याचें भाग्य मला लाभलें. इतर कोठेंहि मला शिकावयास मिळाल्या नसत्या, अशा किती तरी महत्त्वाच्या गोष्टी मला येथें शिकावयास मिळाल्या. प्रो. काळे ह्यांच्यासारख्याच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली परंतु स्वतंत्रपणें मला काम करतां आलें. कोणत्याहि प्रश्नाचा विचार करतांना ते बँकिंगच्या मूलभूत तत्त्वाची नेहमीं कसोटी लावीत. त्यापासून यत्किंचितहि ढळण्यास ते तयार नसत; दिलीच तर इतर बाबतींत ते सवलत देत. एखादी सूचना मला आकर्षक व बँकेच्या दृष्टीनें किफायतशीर अशी वाटली, तरी त्याबाबत मी प्रो. काळे ह्यांच्याशीं चर्चा करूं लागलों म्हणजे ते त्या सूचनेस पार फेटाळून लावीत, असें कित्येक वेळां झालें आहे. मी प्रथम प्रथम निराश होई, परंतु मी त्यांचे दृष्टिकोणांतून पाहूं लागलों म्हणजे मलाच त्या सूचनेंतील धोक्याचीं स्थळें स्पष्ट दिसूं लागत आणि त्यांची भीति बहुतेक वेळां खरी ठरलेली आढळे. प्रत्येक प्रश्नाचा त्यांच्या स्वतःच्या गुणदोषांनुसार विचार करावयाचा; व्यक्तींचा किंवा बँकेच्या संभाव्य तात्कालिक नफ्याचा विचार बाजूस ठेवावयाचा, हें त्यांनीं मला शिकविलें. कांहीं मूलग्राही तत्त्वांवरील त्यांच्या विश्वासाचें एक उदाहरण देतों. बँकेचे पैसे सरकारी रोख्यांत गुंतवावयाचे ते अल्प मुदतीच्या रोख्यांतच गुंतवावयाचे; बिनमुदतीच्या रोख्यांत मुळींच गुंतवावयाचे नाहींत, असा त्यांचा नेहमीं आग्रह असे. युद्धकाळांत बिनमुदतीचे व दीर्घमुदतीचे रोखे गुंतवणुकीच्या दृष्टीनें आकर्षक वाटत होते. त्यांत पैसे गुंतविण्याची सूचना पुढें आली, तर ते निग्रहपूर्वक बाजूस टाकीत. बँकरेट नोव्हेंबर १९५१ मध्यें वाढविण्यांत आला, तेव्हां प्रो. काळे ह्यांच्या म्हणण्याचा दाखला सर्वांना आला.

पहिलीं सात वर्षें चेअरमन म्हणून व पुढें तीन वर्षें डायरेक्टर ह्या नात्यानें त्यांच्या नेतृत्वाखालीं जीं तत्त्वें व जे संकेत घालून देण्यांत आले, त्यांना महाराष्ट्र बँकेच्या प्रगतीचें मोठें श्रेय दिलें पाहिजे. चेअरमन म्हणून ते निवृत्त झाल्यावरहि त्यांचा सल्ला वरचेवर घेण्यांत येत असे. त्यांच्या घरीं जाऊन, बँकिंगविषयक प्रश्नांची शास्त्रीय चर्चा मोकळ्या मनानें, व्यक्तींचा विचार बाजूस ठेवून, करण्याची संधि मला मिळे व त्यांत मला अत्यंत आनंद लाभे. बँकेचा पाया मजबूत करण्याच्या एकाच कसोटीवर त्यांची कृति अवलंबून असे. त्यांना 'कॉंझर्वेटिव्ह' बँकर म्हणून दूषण देण्यांत येत असे; परंतु म्हणून ठरलेलें धोरण यत्किंचितहि बदलण्यास ते तयार नसत. इंग्लिश बँका त्यांची मजबुती कशी वाढवितात, ह्याचीं उदाहरणें ते नेहमीं देत व त्यांसाठी त्यांना किती वेळ लागला ह्याचीहि आठवण करून देत.

प्रो. काळे ह्यांनीं प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीनें माझेसाठी जें केलें त्याबद्दल जाहीरपणें कृतज्ञता व्यक्त करण्याची ही सुसंधि मी घेत आहें. त्यांनींच मला येथें आणलें व मला माझ्या कामांत प्रोत्साहन दिलें, म्हणून महाराष्ट्रासाठी माझ्या कुवतीप्रमाणें शक्य तें मी करूं शकलों. माझ्यावरील त्यांच्या नितांत विश्वासामुळें मला माझ्या कामांत स्फूर्ति व चैतन्य वाटत असे. त्यांच्या मृत्यूनंतरहि, बँकेच्या कचेरींतील त्यांच्या तसबिरीच्या दर्शनानें जरूरीच्या वेळीं मला योग्य तें मार्गदर्शन घडतें, हें नमूद करण्यास मला आनंद वाटतो.




बँकेच्या मुख्य कचेरीची भव्य इमारत

## ध्येयनिष्ठ मंडळींचें ध्येयनिष्ठ कार्य

लेखक :—श्री. आ. रा. भट, एम्. कॉम.

बँक ऑफ महाराष्ट्राची आजवरची प्रगति ही ध्येयनिष्ठ मंडळींचें अध्यक्षीय मार्गदर्शन व कर्तव्यनिष्ठ व्यवस्थापन यांमुळें झाली आहे. प्रा. वामनराव काळे यांनीं बँकेवर अपत्यवत् प्रेम केलें. ते गाढे अर्थशास्त्रज्ञ होते. बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल बँकिंग एन्कायरी कमिटीचे सदस्य होते. त्यांना महाराष्ट्राच्या बँकिंग-विषयक गरजांची पूर्ण कल्पना होती. बाल्यावस्थेंत बँकेला आपल्या अध्यक्षिय संबंधाची विशेष गरज आहे हें ओळखून रिझर्व्ह बँकेच्या स्थानिक संचालक मंडळाचें सदस्यत्व त्यांनीं नाकारलें. बँकेबद्दलच्या नितान्त आपुलकीमुळेंच त्यांनीं हें केलें. तें अध्यक्ष असेपर्यंत बँकेच्या संस्थापनांतील उद्दिष्टें त्यांनीं कधींहि ढोळयाआड होऊं दिलीं नाहींत. त्यांच्या पाठीमागून श्री. धोंडूमामा साठे हे अध्यक्ष झाले. त्यांनीं स्वतःला धस लावून घेऊन बँकेच्या शेअरभांडवलांत वाढ घडवून आणली. बँकेच्या स्थापनेच्या खटपटींत ज्याप्रमाणें त्यांनीं मोठा भाग उचलला त्याप्रमाणेंच बँकेच्या संवर्धनाकरितांहि त्यांनीं परिश्रम केले. श्री. धोंडूमामांच्या नंतर श्री. वामनराव वर्दे अध्यक्ष आहेत. महाराष्ट्राकरितां व्यापारी बँक काढण्याचें त्यांचें स्वप्न मराठा चेंबरनें साकार केलें. संस्थापनेच्या पूर्वतयारीपासून त्यांनीं या कामांत रस घेतला. आज बँकिंगच्या क्षेत्रांत त्यांच्याएवढा दीर्घानुभवी व अधिकारवाणीनें बोलणारा दुसरा महाराष्ट्रीय नाहीं असें म्हटलें तर त्यांत अतिशयोक्ति नाहीं. प्रारंभापासून त्यांच्यासारखा मनुष्य बँकेला मार्गदर्शक मिळाला ही बँकेच्या दृष्टीनें फार महत्त्वाची गोष्ट आहे.

बँकेच्या व्यवसायाची प्रारंभींची घडी श्री. म. वि. गोखले यांनीं बसविली. त्यांच्या निवृत्तीनंतर श्री. चिं. वि. जोग यांनीं बँकेची धुरा उत्तम प्रकारें संभाळून तिचा दर्जा उंचावला आहे. बँकेला वेळोवेळीं व्यापार उदीमांत प्रतिष्ठा पावलेली निरनिराळी मंडळी डायरेक्टर म्हणून लाभली. त्यांच्या अनुभवाचा फायदा बँकेला मिळत आला आहे. बँक ऑफ महाराष्ट्राची स्थापना मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीजनें करून ती संचालक मंडळाच्या स्वाधीन केली. बँकेच्या स्पृहणीय वाढीचें श्रेय त्यांना आहे. मराठा चेंबरला जो आज खास आनंद होत आहे तो त्यानें रुजवलेल्या बीजाच्या पोटीं रसाळ व गोमटें फळ आलें आहे व महाराष्ट्राचा व्यापार–उदीम त्यांच्या रसाचा आस्वाद घेऊन पुष्ट होत आहे, याचा. या रौप्यमहोत्सवाच्या प्रसंगीं बँकेचे अध्यक्ष, संचालक मंडळ, व्यवस्थापक व नोकरवर्ग या सर्वांचें अभिनंदन करून बँक चिरंजीव व्हावी व तिचा महाराष्ट्राच्या आर्थिक उन्नतीला मौलिक हातभार सतत लागत राहावा अशी मराठा चेंबरची परमेश्वरचरणीं प्रार्थना आहे. —संपदा, डिसेंबर १९६०





कै. श्री. गो. द. आपटे श्री. आ. रा. भट

महाराष्ट्र बँकेच्या स्थापनेची पूर्वतयारी करणाऱ्या मराठा चेंबरचे ऑनररी सेक्रेटरी

## महाराष्ट्र बँकेची यशस्वी फलंदाजी

क्रिकेटच्या खेळांत जो फलंदाज पहिल्यापासूनच दांडे बॅटीची रेषा न जुमानतां पुढें जाऊन आडव्या बॅटीनें टोले लगावूं लागतो तो फार काळ टिकत नाहीं. कोणत्या क्षणीं तो बाद होईल ह्याचा नेम नसतो. त्याच्या धावांची एकूण संख्या सहसा फारशी भरत नाहीं. त्याच्यावर भरंवसा ठेवतां येत नाहीं. इतरांचा तो धीर घालवतो.

ह्याच्या उलट प्रकारचा फलंदाज काळजीपूर्वक खेळतो. चेंडू फक्त तटवण्यांत समाधान मानतो. धांवा काढण्यापेक्षा टिकून राहणेंच त्याला माहीत असतें. असा खेळाडूहि धावांच्या दृष्टीनें फारसा उपयोगी पडत नाहीं. तो लवकर बाद होत नाहीं, एवढेंच.

तिसऱ्या प्रकारचा फलंदाज चेंडूवर दृष्टि बसेपर्यंत, आवाका येईपर्यंत, केवळ बचावाचेंच धोरण पत्करतो खरा; पण पुढें मात्र तडफ दाखवून धावांची भरघोस भर घालतो आणि संघाला विजय प्राप्त करून देतो. शंकेलासुद्धां जागा राहणार नाहीं इतक्या व्यवस्थित रीतीनें खेळून पंचाला कामच पडूं द्यावयाचें नाहीं, असें त्याच्या खेळाचें पायाशुद्ध स्वरूप असतें.

आधींचे कांहीं खेळाडू चुका केल्यामुळें लवकर बाद झाले असले, तर मागाहून खेळावयास येणाऱ्या फलंदाजांचें काम अवघड होऊन बसतें. गेलेला विश्वास त्यांना पुन्हां मिळवावा लागतो; धांवांची घाई करून चालत नाहीं. पण घाबरून जाऊन फाजील सावधगिरी बाळगणेंहि चुकीचें ठरतें. बाद न होण्यासाठीच कधींकधीं फटकारे मारावे लागतात !

जी गोष्ट क्रिकेटची, तीच बँकिंगची. एखाद्या बँकेनें मोठ्या नफ्याच्या आशेनें, आकर्षणास बळी पडून, घिसाडघाईनें व्यवहार केले तर तिचा टिकाव लागत नाहीं आणि तिचा मूळ हेतु साध्य होऊं शकत नाहीं. ह्याउलट, तिनें घाबरून जाऊन योग्य व लायक व्यक्ति व उपक्रम ह्यांनाहि वेळेवर भांडवल पुरवण्यांत कुचराई केली तर तिच्या हातून उपकारक कामगिरी फारशी होऊं शकणार नाहीं. तिचे महोत्सव साजरे झाले, तरी तिला कर्तृत्वानें प्राप्त होणारा दर्जा कधींच मिळणार नाहीं.

बँकिंगचे सर्व नियम व संकेत पाळून जी बँक हळूहळू आपला विस्तार करते आणि सुरक्षितपणास बाध येऊं न देतां योग्य प्रसंगीं थोडीफार जोखीम निश्चयपूर्वक पत्करण्यास कचरत नाहीं, तीच बँक उद्योगधंद्यांना सतत भांडवलपुरवठा करीत चिरंजीवी बनते. तिच्या मार्गदर्शनामुळें आर्थिक उपक्रमांची प्रगति होऊन त्यांना जीवन मिळतें. ठेवीदार व जनता ह्यांच्या विश्वासामुळें तिची एकसारखी वाढ होत जाते आणि ती समाजाची आधारस्तंभ बनते.

महाराष्ट्र बँकेच्या बाबतींत नेमकें असेंच घडलें आहे. पूर्वींच्या कांहीं बँका अयशस्वी झाल्यामुळें बँकिंगवरील जनतेचा विश्वास नष्ट झालेला होता, अशावेळीं महाराष्ट्र बँकेची स्थापना होऊन तिनें व्यवहारास प्रारंभ केला. पहिलीं कांहीं वर्षें तिनें आपलें स्थान मजबूत करून, ठेवीदारांचा विश्वास संपादन केला आणि व्यवहाराचा अनुभव मिळविला. आवाका येतांच आपलें कार्यक्षेत्र तिनें वाढवत नेलें. आतां तिचा रौप्यमहोत्सव साजरा होत आहे. काटेकोरपणानें व्यवहार करणारी पण प्रगतिपर अशी ती एक नमुनेदार अग्रेसर व्यापारी बँक बनली आहे.

# महाराष्ट्र बँकेच्या संस्थापकांचा मनोदय,

## अनुकूलता आणि मर्यादा यांच्या जाणीवेनें व्याप वाढविण्याचें धोरण

### प्रो. वा. गो. काळे ह्यांचें बँकेच्या उद्घाटनाचें प्रसंगीं भाषण

मराठी प्रदेशांतील व्यापारउदिमाच्या अडचणी व गरजा यांची ज्यांना कल्पना आहे, त्यांना महाराष्ट्राला व्यापारी व औद्योगिक बाबतींत या इलाख्यांतील इतर भागांच्या बरोबरीचें स्थान प्राप्त करून देण्यास बँकिंगच्या धंद्याची वाढ होणें कसें आवश्यक आहे व त्याकरतां पद्धतशीर व संघटित प्रयत्न कां झाले पाहिजेत याची जाणीव आहे. बँकिंग इन्क्वायरी कमिट्यांनीं या दृष्टीनें सांगोपांग विचार करून आमच्या देशांतील पतीचे व्यवहार करणाऱ्या संस्थांसंबंधींच्या उणीवा नजरेस आणल्या आहेत. या उणीवा दूर करून बदलत्या आर्थिक परिस्थितीच्या गरजा भागवण्यास पुरी पडेल अशी बँकिंगच्या संस्थांची जोपासना करण्याची आवश्यकता कोठें जर विशेष असेल तर ती महाराष्ट्रांतच आहे. राष्ट्रीय चलनाच्या स्थैर्याशीं रिझर्व्ह बँकेचा निकटचा संबंध असल्यामुळें ती स्थापन झाल्यापासून देशांतील व्यापार-उदिमाला लागणाऱ्या पैशाच्या पुरवठ्याबाबत अनेक महत्त्वाचे प्रश्न उपस्थित झाले आहेत. देशांतील चलनव्यवस्था व पतीचे व्यवहार यांत एकसूत्रीपणा आणून त्यांचें नियंत्रण करणें रिझर्व्ह बँकेला शक्य झाल्याशिवाय ती संस्था अस्तित्वांत आली, एवढ्यामुळें व्यापार-उदिमाला फारसा उपयोग होणार नाहीं ही गोष्ट सर्वमान्य झालेली आहे. पतीच्या व्यवहारांत एकसूत्रीपणा आणण्याकरतां जें कार्य होणें आवश्यक आहे तें घडवून आणण्यास साहाय्य करण्याचा बँक ऑफ महाराष्ट्राच्या उत्पादकांचा मनोदय आहे. मराठी प्रदेशांतील लोकांजवळील शिलकी पैशाचा उपयोग याच भागांतील व्यापारउदिमाच्या वाढीकरतां व येथील लोकांची आर्थिक परिस्थिति सुधारण्याकरतां करण्याच्या उद्देशानें या बँकेचें संवर्धन करण्याची त्यांची मनीषा आहे.

#### जुनी सराफी पद्धत

हिंदुस्थानांतील इतर प्रांतांप्रमाणेंच महाराष्ट्रांतहि बँकिंगचा व्यवहार शतकानुशतकें विस्तृत प्रमाणावर फायदेशीर रीतीनें चालत आला आहे व आमच्या इकडील सराफ इतर ठिकाणच्या त्यांच्या व्यवसायबंधूंप्रमाणेंच व्यापारव्यवहाराला लागणारा पैसा पुरविण्याचें कार्य करीत आले आहेत. महाराष्ट्रांतील सराफ-सावकार अनेक जातींचे आहेत व त्यांत, परप्रान्तांतून इकडे येऊन कायम वास्तव्य ज्यांनीं केलें आहे अशा जातींतील लोकांचा भरणा आहे. आमच्याकडील सराफ-सावकारांनीं व्यापारधंद्याला कशी अमूल्य मदत केलेली आहे याचा इतिहास मी या ठिकाणीं सांगत नाहीं; परंतु या संबंधांत माझ्या अवलोकनांत नुकतीच आलेली एक ऐतिहासिक बाब येथें उल्लेखिल्याशिवाय माझ्यानें राहवत नाहीं. दीक्षित-पटवर्धनांचें सराफी घराणें दोनशें वर्षांपूर्वी मोठ्या प्रमाणावर पैशाअडक्याचा व्यवहार करीत असून सुरत, औरंगाबाद, नाशिक, सातारा यांसारख्या दूरच्या शहरांतील हुंड्या हाताळीत असे. नाशिकला तर या सावकारी पेढीची शाखा होती. सदर पेढीच्या १७५० सालच्या रोजनाम्याच्या पहिल्याच पानावर नाशिकच्या तापीदास भुकणदास या गृहस्थांनीं पुण्याच्या दयाराम जीवनदास या गृहस्थांवर काढलेल्या व हरि दीक्षित पटवर्धन यांच्या जमेंत पडलेल्या सात हजार रुपयांच्या हुंडीचा व्यवहार नमूद आहे. दीक्षित-पटवर्धनांची ही सराफी पेढी हुंड्या कटमितीनें विकत घेणें, देणें व वटवणें, सरकाराला व संस्थानिकांना रकमा कर्जाऊ देणें, ठेवी ठेवणें, सोन्या-चांदीचा व्यवहार करणें व नाणीं बदलून देणें, वगैरे हरतऱ्हेचे व्यवहार करीत असे. या पेढीच्या हिशेबांवरून असा व्यवसाय करणारे सराफ लोक ह्या भागांत विखुरलेले होते व इतर प्रांतांप्रमाणेंच महाराष्ट्रांतहि ही जुनी सराफी पद्धत मोडकळल्यामुळें जीर्ण स्वरूपांत आजतागायत चालू आहे. परंतु बदलत्या काळौघाबरोबर जुन्या पद्धतीच्या सराफांस आपला पूर्वीचा दर्जा कायम ठेवण्यासाठी व जीवनकलहांत टिकून राहण्यासाठीं नवीन पद्धतीचा अंगीकार करण्याची आतां आवश्यकता वाटूं लागली आहे.

#### सहकारी पतपेढ्यांचें कार्य

खेड्यापाड्यांतूनहि सहकारी पतपेढ्या निघाल्यामुळें सर्वसाधारण लोकांना पैशांच्या आधुनिक पद्धतीच्या व्यवहाराची बरीच माहिती झाली आहे. काटकसर, शिलकी ठेवी, भांडवलाची सांठवण, चेक, ताळेबंद, कर्जरोख्यांत पैसा गुंतविणें, डिव्हिडंड, मालाच्या तारणावर व वैयक्तिक पतीवर कर्जे देणें-घेणें वगैरे संबंधींची माहिती खेड्यापाड्यांतहि सहकारी पतपेढ्यांमुळें झाली आहे; आणि शहरांतून आधुनिक पद्धतीच्या बँकिंगच्या व्यवहारास तर विशेष चालना मिळाली आहे. सहकारी पतपेढ्यांचें कार्यक्षेत्र मर्यादित असलें तरी त्यांनीं आपल्या यशस्वी व्यवहारांनीं आधुनिक पद्धतीच्या व्यापारी बँकिंगचा धंदा मोठ्या प्रमाणावर करणाऱ्या संस्थेची उपयुक्तता व इष्टता लोकांस चांगलीच पटवून दिली आहे, सहकारी संस्थांतून मिळविलेला अनुभव, बँकेंत खातें ठेवण्याचें त्यांना पटलेलें महत्त्व व उपयुक्तता, पतीच्या व्यवहारांची, चेक व हुंड्या सारख्या साधनांची, रोख्यांची व व्यापारी उलाढालींची त्यांना झालेली माहिती, या सर्व गोष्टींचा उपयोग बँकिंगचें क्षेत्र विस्तृत करण्यास चांगलाच होईल. देशी सराफ-सावकारांचा लोकांच्या, बदलत्या गरजा भागविण्याकडे हळूहळू कां होईना परंतु निश्चित वळलेला कल ही गोष्टहि पतीचे व्यवहार संघटित करण्यास व त्यांत सुधारणा घडवून आणण्यास अनुकूल आहे. पतीचे व्यवहार वाढत्या प्रमाणांत होण्यास महाराष्ट्रांत भरपूर वाव असून त्यासंबंधाची लोकांची निकडीची मागणी आहे व त्याबरोबरच इतस्ततः विखुरलेलें परंतु योग्य कामीं लावण्यासारखें रिकामें पडलेलें भांडवलहि आहे, या गोष्टींबद्दल आतां दुमत राहिलेलें नाहीं. हें रिकामें भांडवल पद्धतशीर रीतीनें गोळा करून एखादी बँक योग्य कामीं लावील तर ती जनतेची मोठीच सेवा करील. अगदीं अलीकडे या प्रश्नाचा जो अभ्यासपूर्वक विचार व चवकशी करण्यांत आली आहे तिचीहि या मताला पुष्टीच मिळते. बँकिंग इन्क्वायरी कमिटीच्या रिपोर्टांचा त्यास पूर्ण आधार आहे.

#### मुंबईचा पुढाकार पण प्रांतांत शाखा फार थोड्या

औद्योगिक, व्यापारी व बँकिंगच्या संस्था स्थापन करण्यांत मुंबईनें पुढाकार घेतला आहे व मुंबईतील बँकांनीं परप्रांतांत शाखा उघडल्या आहेत, तरी स्वतःच्या इलाख्यांत शाखा उघडण्याकडे त्यांनीं दुर्लक्ष केलें आहे. पश्चिम हिंदुस्थानांत बँकिंगचा व्यवसाय सुरू करण्यांत मुंबईचा पुढाकार असला तरी शाखांच्या अगर बँकिंगच्या सोयी आपल्या प्रांतांत ठिकठिकाणीं करून देण्याच्या बाबतींत मुंबईचा पहिला क्रमांक नाहीं. शाखांच्या संख्येचा विचार केला तर पंजाबांतील बँकांचा क्रमांक पहिला, मद्रासच्या बँकांचा दुसरा, बंगालच्या बँकांचा तिसरा, संयुक्त प्रांतांतील बँकांचा चवथा व मुंबईचा पांचवा लागतो. आपल्या प्रांतांत जास्तींत जास्त ठिकाणीं बँकिंगच्या सोयी करून देण्याच्या बाबतींत मद्रास पहिला, पंजाब दुसरा, बंगाल तिसरा, ब्रह्मदेश चवथा, संयुक्तप्रांत पांचवा व मुंबई इलाखा सहावा येतो. दर दह

लक्ष वस्तीला बँकांच्या शाखांची संख्या किती आहे हें विचारांत घेतल्यास वायव्य सरहद्द प्रांत पहिला, कोचीन संस्थान दुसरें, त्रावणकोर तिसरें, पंजाब चवथा, बडोदा पांचवें, ब्रह्मदेश सहावा, म्हैसूर सातवें व मुंबई इलाखा आठवा येतो. दर एक हजार चौरस मैलांस बँकांचीं ऑफिसें किती आहेत याचा विचार केला तर कोचीन पहिलें, त्रावणकोर दुसरें, वायव्य सरहद्दप्रांत तिसरा, पंजाब चवथा, बडोदा पांचवें, बंगाल सहावा, म्हैसूर सातवें, मद्रास आठवा, संयुक्तप्रांत नववा व मुंबई इलाखा दहावा ठरतो.

### साखळी जोडण्याचें काम

मुंबई इलाख्यांत मुंबई शहराबाहेर बँकिंगचा व्यवसाय न पसरण्याला कांहीं विशेष कारणें असूं शकतील; परंतु त्या प्रश्नाची चर्चा मी येथें करूं इच्छित नाहीं. बँकिंगच्या व्यवसायाचे बाबतींत मागें पडलेल्या महाराष्ट्रांत बँकिंगच्या सोयींची वाढ होण्याची व त्यांतील पडून राहिलेली आर्थिक साधनसंपत्ति नीट उपयोगांत येण्याची तीव्रतर जरूरी भासत आहे हें मात्र खरें आहे. मराठी जिल्ह्यांत महाराष्ट्रीय अशी एकहि मोठी बँक आज अस्तित्वांत नाहीं आणि असल्या संस्थेची जागा मुंबईच्या बँकांच्या शाखांनीं भरून निघणें अशक्य आहे. शेतीच्या उत्पन्नाच्या व्यापारासाठी लागणाऱ्या पैशाकरतां, सहकारी शहरी बँकांकरतां व इकडील संस्थानांतून समाईक भांडवलाच्या बँकाकरतां दिवसेंदिवस वाढत चाललेल्या मागणीवरून ही गोष्ट चांगलीच निदर्शनास आली आहे. शहरें व जानपद प्रदेश ह्यांची व्यापाराची साखळी जोडण्याचें काम अगत्याचें असून तें हातीं घेण्याचा आमच्या बँकेचा उद्देश आहे.

### पूर्वीच्या अनुभवाचा फायदा

स्थैर्य व सुरक्षितता यांवर बँकिंगव्यवसाचें यश अवलंबून असतें. बँका काढण्याच्या बाबतींतील उत्साहातिरेकामुळें या दोन मूलभूत गोष्टींकडे दुर्लक्ष केलें जाण्याचा जसा संभव आहे त्याप्रमाणें पूर्वी बँकांच्या बाबतींत आलेल्या अपयशाच्या आठवणीमुळें पुन: बँकिंगच्या व्यवसायाकडे फिरकूं नये असा भेकडपणा व बेफिकिरी उत्पन्न होण्यांतहि धोका आहे. पतीच्या व्यवहारांकडे लक्ष लागण्यासारख्या वातावरणाचा अभाव, प्रत्यक्ष अनुभव व धंद्यांतील धाडस यांची वाण, पतीचे व्यवहार करतांना येणाऱ्या अडचणींना तोंड देण्यास लागणाऱ्या मानसिक तयारीचा अभाव, धंदा पद्धतशीर व शिस्तीनें चालविण्याची नसलेली संवय, पतीचे व्यवहार करणाऱ्या बँका व इतर संस्था यांचेजवळ पडून राहिलेला पैसा व तो कसा सुरक्षितपणें गुंतवावा याबद्दल उत्पन्न झालेली चिंता, हे सर्व खोल विचार करण्यासारखे प्रश्न असून त्यांच्याकडे दुर्लक्ष करून व त्यांना कमी लेखून चालणार नाहीं, हें सत्य आहे. तथापि, पूर्वीच्या कटु अनुभवासंबंधानें माझें म्हणणें असें आहे कीं, महाग पडलेल्या त्या अनुभवाचा चालू व भावी कार्य यशस्वी करण्याकडे आपण उपयोग करून घेतला पाहिजे.

### नव्या बँकेस अनुकूल काळ

नाणेबाजारांत पडून राहिलेल्या पैशासंबंधानें माझें असें निश्चित मत बनलें आहे कीं, त्याचा उपयोग योग्य कामीं करणें शक्य आहे, एवढेंच नव्हे तर तसा तो करणें फायदेशीरहि आहे. वस्तुत: व्यापार-परिस्थितींत सुधारणा होऊं लागतांच त्याचा पुरेपूर फायदा स्वत:च्या पदरांत पाडून घेण्याच्या दृष्टीनें सध्यांचा काळ नवीन बँक काढण्याला विशेष अनुकूल आहे. बँक ऑफ महाराष्ट्राच्या संस्थापकांना चालू परिस्थितींतील अनुकूलता व मर्यादा या दोहोंचीहि जाणीव असून त्यांनीं हलुहळू परंतु निश्चितपणें पुढें पाऊल टाकण्याचें ठरविलें आहे. त्यांच्या आकांक्षेची भरारी उंच असली तरी त्यांचे पाय जमिनींत नीट रुतलेले आहेत. व्यापारी बँकांना ज्या प्रकारचा व्यवसाय करणें या धंद्यांतील कोविदांनीं योग्य असें ठरविलें आहे, त्या प्रकारचा सर्व शाखांतील व्यवसाय आमची बँक करील व अशा रीतीनें जनतेच्या बँकिंगबाबतच्या गरजा पुरविण्यास झटेल. परिस्थितीची शक्यता व लोकांच्या गरजा विचारांत घेऊन आम्ही आमचा व्याप वाढवूं व जरूरीप्रमाणें महाराष्ट्रांत व महाराष्ट्राबाहेरहि शाखा उघडून वा अन्य तऱ्हेनें आम्हीं आमचे संबंध जोडूं. व्यापारीवर्गाच्या सहकार्यानें व जनतेच्या सक्रिय सहानुभूतीनें लवकरच इच्छित यश संपादन करण्याची आम्हांस उमेद वाटत आहे. आमची बँक लवकरच महाराष्ट्राची मध्यवर्ती बँक बनेल, अशी आमची दृढ आशा आहे.

---

## बँकेचा व्यवस्थापक आणि कर्मचारी वर्ग

श्री. म. वि. गोखले, सी. ए. आय्. बी. (लंडन) हे बँकेचे पहिले व्यवस्थापक होते. सन १९४२ मध्यें त्यांनीं राजिनामा दिला.

सध्यांचे व्यवस्थापक श्री. चिं. वि. जोग हे बी. काम्., एफ्. आय्. बी (लंडन) असून त्यांनीं सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. व बँक ऑफ बडोदा लि. यांसारख्या दोन मोठ्या व्यापारी बँकांत जबाबदारीच्या जागेवर पूर्वी काम केलेलें आहे. त्यांची शैक्षणिक पात्रता व दीर्घ अनुभव लक्षांत घेऊन संचालकमंडळानें सन १९४३ मध्यें त्यांची व्यवस्थापक म्हणून नेमणूक केली व ते अद्यापहि त्याच जागेवर काम करीत आहेत. आपल्या १७ वर्षांच्या कारकीर्दींत त्यांनीं बँकेची अत्यंत आस्थेवाईकपणें सेवा केली असून बँकेच्या प्रगतीस हातभार लावला आहे. या रौप्यमहोत्सवाच्या शुभप्रसंगापासून त्यांना जनरल मॅनेजर या नांवानें संबोधण्यांत येऊं लागलें आहे.

१९५१ मध्यें संचालक मंडळानें श्री. जोग यांस आधुनिक पाश्चात्य बँकिंगच्या पद्धतींचें निरीक्षण करण्यासाठी इंग्लंड व युरोपांतील अन्य देशांत पाठविले होते. या दौऱ्यावर असतांनाच ते इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्सचे फेलो म्हणून निवडले गेले. त्यांचें बँकिंगविषयक ज्ञान व अनुभव हीं बँकेच्या प्रगतीस फार साहाय्यक झालीं आहेत. अलीकडेच ते इंडियन बँकस् असोसिएशनच्या कार्यकारी मंडळाचे सभासद निवडले गेले आहेत. असोसिएशनच्या कार्यांत ते फार उत्साहानें लक्ष घालतात.

### कर्मचारी

कर्मचाऱ्यांची नेमणूक करतांना शैक्षणिक पात्रता व अनुभव असलेल्या इसमांची अधिकाराच्या व जबाबदारीच्या जागांवर नेमणूक करण्याचें संचालक मंडळाचें सुरुवातीपासूनचें धोरण आहे. सध्यां बँकेंत एकूण ५४ पदवीधर, १६ द्विपदवीधर व ३६ इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्सची परीक्षा उत्तीर्ण झालेले कर्मचारी आहेत. कर्मचारी बंधूंस बँकिंगविषयक परीक्षा देण्यास बँक नेहमीं सक्रिय उत्तेजन देते. सर्व थरांतील कर्मचारी बंधूंनीं आपलें काम कुशलतेनें व निष्ठेनें करून बँकेच्या प्रगतीस हातभार लावला आहे.

#### कर्मचारी वर्ग व त्यांचें वेतन

| वर्ष | कर्मचाऱ्यांची संख्या | एकूण वेतन (रु.) |
|---|---|---|
| १९५५ | ३५३ | ६,७१,०५९ |
| १९५६ | ४०५ | ७,७५,९५६ |
| १९५७ | ४८३ | ९,४०,९९१ |
| १९५८ | ५७८ | १२,१२,२०९ |
| १९५९ | ७०८ | १५,७३,१०६ |

## " महाराष्ट्र बँकेची स्थापना : गाजावाजा न करतां केलेली राष्ट्रसेवा "

### सर सोराबजी पोचखानवाला ह्यांचें बँकेच्या उद्घाटन-प्रसंगीं भाषण

हिंदी बँकिंगची वाढ व प्रगति व्हावी, अशी माझी मनापासून इच्छा आहे व हिंदुस्थानांत एका काळीं बँकिंगला जो उच्च दर्जा होता तो त्यास पुनः प्राप्त झाला, तर माझ्या परिश्रमाचें चीज झालें, असें मीं समजेन. पाश्चिमात्य देशांतील लोकांस बँकिंगचा श्रीगणेशा देखील येत नव्हता, अशा वेळीं हिंदी बँकिंगचा धंदा प्रगतीच्या उच्च स्थानीं विराजमान झाला होता, परंतु आज तो अत्यंत मागासलेला आहे, हा योगायोग विचित्र आहे. श्रॉफ व सावकार ह्यांचे कार्याबद्दल कित्येक वेळां अनुदार शब्द ऐकूं येतात. तथापि प्रो. काळे ह्यांनीं दाखवून दिल्याप्रमाणें त्यांनीं आजवर केलेली व सध्यां ते करीत असलेली कामगिरी विसरून चालणार नाहीं.

### सराफ मागें का पडले ?

पूर्वी आमच्या सराफांस वजन व महत्त्व असे, परंतु आतां ते मागें पडले आहेत. त्यांच्या प्राप्तीचें मानहि उतरलें आहे. उदाहरणार्थ, पैशाची एका ठिकाणाहून दुसरीकडे वर्गावर्गी करतांना त्यांस मिळत असलेला फायदा, वाहतुकीचीं साधनें स्वस्त व सोईस्कर झाल्यानें आतां पूर्वीसारखा उरलेला नाहीं; केवळ बँकिंगचा धंदा फायदेशीर न राहिल्यानें ते लोक सराफीबरोबर व्यापारहि करूं लागले. ह्या कारणानें, स्वतःचें भांडवल आणि दुसऱ्यानें ठेव म्हणून ठेवलेला पैसा ह्या दोहोंचा विनियोग व्यापारासाठी करण्याचा मोह त्यांस आवरणें कठीण झालें. ह्या तऱ्हेच्या व्यवहारांचा परिणाम हळुहळू त्यांच्या सामर्थ्यावर अनिष्ट असाच झाला. सराफांनीं मागें उत्कृष्ट कामगिरी केली असली, तरी सध्याच्या बदललेल्या काळांत शास्त्रशुद्ध व अभिनव पद्धतीच्या बँकिंग खेरीज—जॉइंट स्टॉक व्यापारी बँकांखेरीज—भागणार नाहीं, हें विसरतां कामा नये. ह्या बाबतींत विशेषतः हिंदुस्थान फार मागासलेला आहे. हिंदुस्थाननें बँकिंगच्या क्षेत्रांतील आपलें स्थान पुनः मिळवावें व त्यानें आधुनिक काळांतील बँकिंगच्या प्रगतीच्या मागें राहूं नये, ह्याकरतां सर्वांनीं योग्य मार्ग शोधून काढला पाहिजे. राजकीय सत्ता प्राप्त करून घेण्याची खटपट जशी आवश्यक आहे, त्याप्रमाणेंच स्वदेशी धंद्यांचें पुनरुज्जीवन व्हावें व आर्थिक क्षेत्रांतील आपलें पहिलें स्थान पुनः आपणांस मिळावें असा प्रयत्न करणें हीच खरी देशभक्ति समजली पाहिजे.

ह्या दृष्टीनें पाहतां, 'दि बँक ऑफ महाराष्ट्र' सारख्या बँकिंग संस्थेची स्थापना, ही राष्ट्रसेवाच—गाजावाजा न करतां केलेली सेवा—समजली पाहिजे.

### बँकिंगच्या सवयीचें राष्ट्रीय महत्त्व

'दि बँक ऑफ महाराष्ट्र' च्या पद्धतीच्या प्रादेशिक बँका, हिंदी बँकिंगच्या प्रगतीस अत्यावश्यक आहेत, असें माझें पहिल्यापासून मत आहे; कारण ह्या तऱ्हेच्या बँकाच बँकिंगची संवय समाजास लावूं शकतील व आपला देश व इतर देश ह्यांमधील ह्या संबंधांतील तफावत त्या दूर करतील, अशी माझी खात्री आहे. कांहीं वर्षांपूर्वीच्या मानानें अलीकडे हिंदी बँकिंगची प्रगति बरीच शीघ्र झाली आहे, परंतु त्यांत योग्य मार्गदर्शकत्वाचा अभाव दिसून येतो, हें दुर्दैव होय. बँकिंगचें क्षेत्र ठराविक चाकोरीच्या बाहेर गेलेलें नाहीं व खेड्यापाड्यांत जेथें त्याची जरूरी ज्यास्त भासते, तेथें त्याचा प्रवेश न होता बँकांनीं शहराबाहेर आपलें क्षेत्र वाढविण्याचा प्रयत्न केलेला नाहीं. मद्रास व पंजाबसारख्या प्रांतांतील बँकांनीं खेडेगांवांची आठवण ठेवली आहे व बंगालमधील 'लोन ऑफिसेस' खेडुतांसाठी उत्कृष्ट कार्य करीत आहेत, ह्याची मला जाणीव आहे. परंतु इतर प्रांतांतील बँकांस खेड्यांतील लोकांसंबंधाच्या स्वतःच्या कर्तव्याची इतकी जाणीव आहे, असें दिसत नाहीं. 'ग्रामसुधारणे'सारखे अगडबंब शब्द आपण रोज ऐकतों, परंतु, खेड्यापाड्यांतील लोकांस काटकसर व बचत ह्यांची संवय लावण्याच्या आवश्यकतेकडे जरूर तेवढें लक्ष देण्यांत आलेलें नाहीं, ही जशी खेदाची तशीच आश्चर्याची गोष्ट आहे. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा कमी करण्याचा व त्यांस बँकिंगची संवय लावण्याचा शिकस्तीचा प्रयत्न आज कित्येक वर्षे सहकारी चळवळ करीत आली आहे, परंतु ह्या चळवळीची प्रगति सर्व प्रांतांत सारखी झालेली नाहीं, व जेथें ती थोडीफार झाली आहे, तेथें सुद्धां जरूरीच्या मानानें तिचा प्रसार अत्यल्प झालेला आहे. प्रो. काळे ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें, व्यापारी संयुक्त भांडवलाच्या मंडळ्यांस खेड्यांतील लोकांची सेवा करण्यास अमर्याद वाव आहे. खेडेगांवीं लोकांचें एकूण लोकसंख्येशीं असणारें प्रमाण व त्यांचें देशाच्या आर्थिक घटनेंतील महत्त्वाचें स्थान लक्ष्यांत घेणें जरूर आहे. बँकिंगच्या संवयीचें राष्ट्रीय महत्त्व जाणून खेडुतांस ही संवय जडावी ह्याकरितां एकसारखा व जोराचा प्रयत्न चालू ठेवला पाहिजे.

### स्थानिक गरजांची माहिती व सहानुभूति

निरक्षरता व जुन्यास चिकटून बसण्याची प्रवृत्ति ह्या खेडेगांवांच्या प्रगतीच्या मार्गातील दोन मोठ्या अडचणी आहेत व आपल्या इच्छेप्रमाणें बदल एकदम घडून येणें अशक्य आहे. प्रत्येक खेडेगांवीं नाहीं, तरी निदान प्रत्येक तालुक्याच्या गांवीं एक बँक असण्यास अडचण येऊं नये. अशा बँकांनीं आजूबाजूच्या प्रदेशांतील लोकांस बँकिंगची संवय लावण्याचा प्रयत्न करणें अगत्याचें आहे. ही गोष्ट परिणामकारक रीतीनें व्हावयाची असल्यास व शेतकरी आणि खेडेगांवांतील कामगार ह्यांच्या आर्थिक गरजा भागवायच्या असल्यास सदरहु बँकांचे चालक त्या विशिष्ट ठिकाणचेंच असणें इष्ट आहे. अर्थात् लोकांच्या विशिष्ट गरजा व अडचणी ह्यांच्याकडे सहानुभूतीनें पाहणारे माहितगार इसमच बँकांचे सूत्रधार होणें जरूर आहे.

इलाख्याची राजधानी किंवा शेंकडों मैलांवरील इतर शहरें येथें मध्यवर्ती कचेरी असलेल्या बँकांच्या हातून हें काम नीट पार पडणार नाहीं. कारण त्यांच्या चालकांस स्थानिक लोकांइतकें विशिष्ट परिस्थितीचें ज्ञान असणें शक्य नाहीं, व तीबद्दल सहानुभूतीहि कमीच वाटणार, हें उघड आहे.

### मागील अनुभवापासून काय शिकावे !

'दि बँक ऑफ महाराष्ट्र' आतां आपल्या व्यवहारास जोरानें सुरवात करणार आहे. तेव्हां कोणत्या गोष्टींबद्दल तिनें विशेष काळजी घेतली पाहिजे, ह्याबद्दल दोन शब्द सांगणें जरूर आहे. हिंदी बँका मागें कां बुडल्या ह्याचीं कारणें आपणां सर्वांस माहीत आहेतच. सुरवातीच्या काळांत, बँकिंगच्या संस्था चालविण्यास आवश्यक असणाऱ्या अनुभवी हिंदी बँकर्सचा अभाव, ही मोठी अडचण होती, ती आतां विशेष उरलेली नाहीं. तथापि, सध्यांच्या व पुढें निघणाऱ्या बँकांनीं (१) अप्रामाणिक मार्गाचें अवलंबन व (२) सट्टेबाजी ह्या दोन धोक्यांच्या मार्गांपासून दूर

राहणें जरूर आहे; हींच दोन कारणें बँकांच्या नाशास मागें कारणीभूत झालेलीं आहेत. बँकिंग व सामान्य व्यापार ह्या दोघांचें मिश्रण करण्याची प्रवृत्ति, हें बँका बुडण्याचें आणखी एक बलवत्तर कारण होतें. १९१३–१४ च्या गडबडीच्या काळांत बँका कां बुडाल्या ह्याचें वर्णन इंडियन इंडस्ट्रिअल कमिशनपुढें साक्ष देतांना, अलाहाबाद बँकेचे सर टॉमस स्मिथ ह्यांनीं केलें आहे. बँका म्हणवून घेणाऱ्या कित्येक संस्थांनीं गाड्या तयार करणें व कृष्ण–शुश्रूषा ह्यांचा अंतर्भाव बँकिंगच्या व्यवहारांतच केला होता! कित्येक हिंदी बँकांचे म्यानेजर व डायरेक्टर्स स्वार्थ बुद्धीनें स्वतःचे खिसे गरम करण्यांतच गर्क असत; आणि ठेवीदार व भागीदार ह्यांच्या हितसंबंधांकडे दुर्लक्ष होत असे. त्याचप्रमाणें, डायरेक्टरांमध्यें परस्परांत वितुष्ट आणि डायरेक्टर व म्यानेजर ह्यांचेमध्यें होणारी अनिष्ट धुसफुसहि बँकांच्या यशाचे मार्गांत आड आली.

### महाराष्ट्र बँकेचें स्वागत

' दि बँक ऑफ महाराष्ट्र ' चे अधिकारी आपली समाजहित-संबंधाची जबाबदारी पूर्णपणें ओळखतात, ह्याबद्दल माझी खात्री आहे व आतांच निर्दिष्ट केलेल्या अडचणी ते टाळतील ह्याबद्दल मला शंका नाहीं. धोक्याचीं स्थळें ह्या प्रसंगीं दाखवून देण्यांत माझा उद्देश इतकाच आहे कीं, तीं माहीत असलीं म्हणजे मनुष्य त्यांचा प्रतिकार करण्यास सज्ज राहतो. म्हणून, गतकालच्या बोधप्रद घडयांचें वाचन मधून मधून करणें आपल्या हिताचें असतें.

महाराष्ट्रांतील सर्व प्रमुख गांवांतून बँकिंगच्या सोयीचा प्रसार करण्याकडे ' दि बँक ऑफ महाराष्ट्र ' चे अधिकारी लक्ष वळवतील, असा मला विश्वास आहे. महाराष्ट्राबाहेर शाखा स्थापन करण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा महत्त्वाच्या खेड्यांतून उपशाखा त्यांनीं उघडाव्यात, असें मीं सुचवितों. त्याचप्रमाणें, इतर ठिकाणीं शाखा असणाऱ्या मोठ्या शहरीं बँकांशीं 'एजन्सीज'च्या स्वरूपानें सहकार्य करून शहरांतील व खेडेगांवांतील बँकिंगमध्यें एकसूत्रीपणा आणतां येईल. दूरदूरच्या ठिकाणीं शाखा असल्या म्हणजे जास्त कार्य होतें, असें मुळींच नाहीं. मोठ्या भांडवलाच्या व धनाढ्य बँकांकडे हें काम सोपवावें. जरूर त्या विशिष्ट क्षेत्रापुरतें आपलें कार्य मर्यादित करून तितकेंच, किंबहुना जास्त, महत्त्वाचें काम लहान बँका करूं शकतील. ' दि बँक ऑफ महाराष्ट्र 'नें ह्या सूचनांप्रमाणें महाराष्ट्रांतलि लोकांच्या उन्नतीस मदत केली, तर ती उच्च दर्जाची देशसेवा होईल, ह्यांत संशय नाहीं. ह्या नव्या बँकेस जनतेकडून सहकार्य व पाठिंबा मिळेल, अशी मला खात्री वाटते.

## तुलनात्मक प्रगतीचे आकडे

१९४०–१९५९

| वर्ष | शाखांची संख्या | वसूल भांडवल (रु.) | रिझर्व्ह व इतर फंड (रु.) | ठेवी (रु.) | कर्जें (रु.) | इन्व्हेस्टमेंट (रु.) | खेळतें भांडवल (रु.) | निव्वळ नफा (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९४० | २ | १,८१,००० | २९,००० | २७,५२.००० | १३,०५,००० | ११,४६,००० | ३०,३९,००० | २०,००० |
| १९४५ | ९ | १२,५०,००० | २,७०,००० | १,२९,७५,००० | ६०,१९,००० | ६०,४७,००० | १,५५,९०,००० | १,७०,००० |
| १९५० | १८ | १६,००,००० | ४,७१,००० | २,३०,७४,००० | १,२५,१९,००० | ९०,०४,००० | २,७२,४६,००० | २,३०,००० |
| १९५५ | २९ | १६,००,००० | ७,७५,००० | ५,०६,३१,००० | २,३३,६६,००० | २,३८,४४,००० | ५,८६,४०,००० | ३,४६,००० |
| १९५६ | ३४ | १६,००,००० | १०,०९,००० | ६,२६,०८,००० | २,९५,९६,००० | २,५६,९९,००० | ७,३२,५५,००० | ४,०१,००० |
| १९५७ | ३८ | २२,९४,००० | ११,५०,९०० | ७,८५,५३,००० | ३,७८,७६,००० | २,५४,८५,००० | ९,२७,५६,००० | ४,६९,००० |
| १९५८ | ४४ | २८,१९,००० | १३,९०,००० | १०,५५,८९,००० | ४,२०,४९,००० | ४,८१,४०,००० | १२,३१,२२,००० | ५,५६,००० |
| १९५९ | ५१ | ३१,६८,००० | १४,६०,००० | १३,२५,५६,००० | ५,०६,६७,००० | ६,५२,६४,००० | १५,६७,३३,००० | ७,७२,००० |

### व्यावहारिक सहृदयता

महाराष्ट्र बँकेनें किती उद्योगधंदे वांचविले, कितींना प्रेरणा दिली, किती वाढवले, ह्याची गणती येथें करतां येणें अशक्य आहे. महाराष्ट्रांतील एका मोठ्या कारखान्याची ही गोष्ट आहे. चालकांनीं सर्वस्व पणास लावून कारखाना उभा केला आणि यशस्वी करून दाखविला. तो सुस्थिर होण्यासाठीं आणखी मशिनरी परदेशांतून मागविली. भांडवलाच्या जमवाजमवीचा अंदाज चुकला आणि मशिनरी मुंबई बंदरांत येऊन दाखल झाली तरी सोडवून घेतां येईना. कितीहि कमिशन, व्याज देऊं करूनहि रक्कम उभी होईना. चालकांनीं महाराष्ट्र बँकेकडे धांव घेतली. संचालक मंडळानें तांतडीची सभा घेतली आणि होकारार्थी निर्णय घेतला. चालकांनीं मशिनरी फॅक्टरीवर नेऊन उभारली आणि मोसम गांठला. बँकेचे हप्ते फिटले गेले. कंपनी तरली गेली, इतकेंच नव्हे तर भरभराटीस आली. बँकेच्या चालकांनीं सुरक्षितपणा राखून मुख्य म्हणजे महाराष्ट्राच्या कारखानदारांचें हित पाहिलें.

एका होतकरू तरुणानें नोकरी सोडून दिली आणि एक लेथ घेऊन धंदा करण्याचें ठरविलें. त्यानें बँकेकडे मदतीची विनंती केली. माणूस होतकरू, विश्वासू व खटपटी आहे; त्याच्या मालास गिऱ्हाईक आहे हें चालकांनीं पाहिलें आणि लेथ घेण्यास छप्पर उभारण्यास भांडवल पुरविलें. ऑर्डरीमागून ऑर्डरी मिळून कारखाना भरभराटीस आला. दुसऱ्या एका कारखान्याला माल सोडविण्यासाठीं बँकेनें लहानशी रक्कम दिली; तो कारखाना आतां लाखों रुपयांचें उत्पादन करीत आहे. कित्येक कारखान्यांना आजचे दिवस पाहायला मिळाले, त्याचें श्रेय महाराष्ट्र बँकेच्या ' व्यावहारिक सहृदयतेला ' च द्यावें लागेल; कितीतरी व्यापारी आपल्या उत्कर्षाबद्दल बँकेला दुवा देत आहेत.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास ' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.